२. पोलीस उप अधीक्षक, (मुख्यालय), टि.व्ही.सेंटर जवळ, एन-१०, सिडको, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबज़ावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-8661 दिनांक :-10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२०४/२०२५

बोर्ड अ.क्र.०२

श्री. निवृत्ती रंगनाथ सोनवणे, — अपिलार्थी
मु. पो. सवदगाव, ता. वैजापूर, जि.. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर- ९४२१४१७३०२.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप जिल्हा रुग्णालय,
वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
आरोग्य अधिकारी,
उपजिल्हा रुग्णालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०२	०९.१०.२०२४	दि.०१. एप्रिल २०२२ ते दि.३१ मार्च २०२४ या कालावधीतील उपजिल्हा रुग्णालय वैजापूर येथील १. आपल्या रुग्णा विकासास प्राप्त झालेल्या औषध साठयाची माहिती, २. मुदत संपलेले औषध मेडीसीन कंपनीचे नाव देण्यात यावे, ३.नष्ठ केलेले औषध कंपनीचे नाव, ४.वाटप केलेले औषध कंपनीचे नांव, ५. एकूण प्राप्त झालेले औषध साठा मिळावा इ. माहिती प्रमाणित करुन देण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हा रुग्णालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी,

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (सन २०२३-२०२४ एक वर्षे कालावधीची) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. आरोग्य अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8662 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२०९/२०२५

बोर्ड अ.क्र.०३

श्री. अनिस शहामद पटेल, — अपिलार्थी
मु. कोळीबोडखा, पो. थेरगांव,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर-४३११२१.
मो. नंबर-९५२७८७४००१

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०३	१५.१०.२०२४	सन २०१९ ते आजपावेतो या कालावधीतील मग्रारोहयो अंतर्गत पैठण तालुक्यात गावनिहाय झालेल्या काम व प्राप्त व विनियोगाचा तपशिल, १. उपरोक्त कालावधीत पैठण तालुक्यात मग्रारोहयोअंतर्गत राबविलेल्या विविध योजना, केलेली कामे, वाटप कुशल व अकुशल देयकांचा लाभार्थ्यांच्या नावांसह तपशील वर्षनिहाय २. मग्रारोहयोअंतर्गत रस्ते, विहिरे, पेव्हर ब्लॉक, वृक्षलागवडीचा लाभार्थ्यांचे नाव, गाव व वाटप निधींच्या तपशीलासह माहिती, रस्ते, पेव्हर ब्लॉक कामाचे अंदाजपत्रके, सर्व कामावरील मजूरांचे हजेरीपत्रके, कामाचे प्रारंभ व शेवटचे जिओ टॅग फोटो, प्रशासकीय मान्यता ग्रामपंचायतीचे ठराव, कार्यारंभ आदेश, सदरील योजना राबविण्यात आलेले ठिकाण, आपल्या उपरोक्त कामांचे दाखल प्रस्ताव व कुशल बिलाचे प्रस्तावाचे छायांकित प्रती.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमकी माहिती मागितलेली नाही. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8663 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२१०/२०२५

बोर्ड अ.क्र.०४

श्री. अनिस शहामद पटेल, — अपिलार्थी
रा. कोळीबोडखा, ता. पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३११२१.
मो. नंबर-९५२७८७४००१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, पाचोड,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
वैद्यकीय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०४	०९.१०.२०२४	सन २०१५ ते आजपावेतो या कालावधीतील, आपल्या कार्यालयाची कार्यप्रणाली व राबविण्यात आलेल्या योजना/ कामकाजांची कार्यप्रणाली व राबविण्यात आलेल्या योजना/ कामकाजांची माहिती. १. ग्रामीण रुग्णालयातंर्गत कार्यप्रणाली, ग्रामीण रुग्णालयाशी संलग्न विभाग, ग्रामीण रुग्णालयासह ट्रॉमा, NRHM आयुष्य, बालस्वास्थ्य विभाग, प्रयोगशाळा अंतर्गत नियुक्त वैद्यकीय अधिकारी कर्मचारी संख्या, नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांची नावे, त्यांचे हजेरीपत्रक, महिन्याकाठी होणारे पगारांचा तपशील, महिन्याकाठी घेणारा औषधी, विदयुत, जनरेटर इंधन, साफसफाई खर्चाचा तपशील, नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांच्या रोजनिशी, घरभाडयांचा तपशील आजपावेतो झालेल्या रुग्ण कल्याण समितीच्या बैठका झालेले निर्णय, खर्चाचा तपशीलांच्या छायांकित प्रतीत माहिती देण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमकी माहिती मागितलेली नाही. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8664 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५५६/२०२५

बोर्ड अ.क्र.०५

श्री. विष्णू भगवानराव ढवळे, — अपिलार्थी
रा. देहू निवास, इंदिरानगर पैठण,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा परिषद मुलांची शाळा पैठण,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद मुलांची शाळा, पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०५	२७.०८.२०२४	दि.०१ जानेवारी २०२० ते आजपर्यंत या कालावधीतील, आपल्या शाळेतील शालेय शिक्षण समिती बाबत माहिती मागितलेली आहे. १. वरील एकूण कालावधीत किती वेळेस शालेय समित्यांची नियुक्ती करण्यात आली व नियुक्त केलेल्या अध्यक्षांची नावे द्यावीत. २. सध्या नियुक्त असलेल्या शालेय समितीची निवड कधी करण्यात आली व अध्यक्ष कोण आहेत. ३. वरील संपूर्ण कालावधीत झालेल्या निर्णय/ ठरावांच्या प्रती द्याव्यात. ४. वरील संपूर्ण कालावधीत आर्थिक देवाण घेवाण झालेली असल्यास अदा करण्यात आलेल्या बीलांच्या प्रती व खर्च ठरावांच्या प्रती द्याव्यात.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8665 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५६९/२०२५

बोर्ड अ.क्र.०६

श्री. विष्णु भगवानराव ढवळे, — अपिलार्थी
रा. देहू निवास, इंदिरानगर, पैठण, .
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९८२२००८३५६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. अभियंता श्रेणी-१, जायकवाडी पाटबंधारे उप विभाग-०१,
नाथनगर (उ.) पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उ.)
पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावंणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०६	२६.११.२०२४	जानेवारी २०१७ ते आजपर्यंत या कालावधीतील, जायकवाडी प्रकल्पानंतर संत ज्ञानेश्वर उद्यान येथे नियुक्त केलेल्या औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचारी संदर्भात पुढील प्रमाणे माहिती द्यावी. अ) आपल्या कार्यालयाकडून सुरक्षा रक्षक मंडळ कार्यालयाला दिलेल्या मागणी पत्रांच्या प्रती द्याव्यात. आ) आपल्या विभागाने शिफारस पत्रे देऊन काही सुरक्षा रक्षकांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत, सदर शिफारस पत्रांच्या प्रती द्याव्यात. इ.) वरील कालावधीत वेगवेगळया काळात सुरक्षा रक्षकांची नेमणुक झालेली आहे, सदर नेमणुकांच्या तारखा द्याव्यात.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०८.०१.२०२५ रोजी कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१ यांनी संबंधीत अपिलार्थी यांच्या अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यवाही केलेली असल्यामुळे अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, सहाय्यक अभियंता श्रेणी-१, दगडी धरण उपविभाग क्र.०१ नाथनगर (उत्तर) पैठण यांनी कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) पैठण यांना दि.०८.०१.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे बोध होत नाही. यास्तव अपिलार्थी यांना पुन:श्च एकदा माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता श्रेणी-१, जायकवाडी पाटबंधारे उप विभाग-०१, नाथनगर (उ.) पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (पुन:श्च एकदा) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उ.) पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8666 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २७३४/२०२५

बोर्ड अ.क्र.०७

श्री. विनोद आत्माराम तायडे, — अपिलार्थी
रा. रांजणगांव (शेंनपुंजी), पो. बजाजनगर पवननगर,
ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-८०१०७८९७८५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, प. प्रा. शिक्षक, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटावा, केंद्र वाळूज, ता. गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटावा, केंद्र वाळूज,
ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०७	०७.०१.२०२५	आपल्या शाळेतील मुख्यालयी राहणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या नावाची यादी मिळणे बाबत व त्यांच्य रुम भाडे करार नाम्यासह सत्यप्रतीत माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२९.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, सदरील माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधीत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम कम ११(१) अंतर्गत संबंधीतांना नोटीस देऊन त्यांना विचारणा करण्यात आली की, माहिती प्रकट करावे किंवा कसे संबंधीतांनी सदर माहिती त्यांची खाजगी बाब म्हणजे व्यक्तीगत स्वरुपाची असल्यामूळे देऊ नये असे कळविले आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी माहिती अपिलार्थी यांना देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, प. प्रा. शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटावा, केंद्र वाळूज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विटावा, केंद्र वाळूज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8667 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३८७४/२०२५

बोर्ड अ.क्र.०८

श्री. काझी आसिफ हिसामुध्दीन, — अपिलार्थी
रा. अजिंठा, ता. सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३१ ११७.
मो. नंबर-९६६५९७०७६२.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय, अजिंठा,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, अजिंठा,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०८	३०.०६.२०२५	१. अजिंठा ग्रामीण रुग्णालयात एकूण किती कर्मचारी आहेत ? प्रत्येक कर्मचाऱ्यांचे नाव, पद, नियुक्तीची तारीख व नियुक्तीचा आधार (कायम, करार, आउटसोर्स इत्यादी) प्रत्येक कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोणत्या शासन निर्णय (GR) किंवा आदेशावर झाली आहे ? त्याची प्रत जोडावी. २. ग्रामीण रुग्णालयातील सुरक्षा रक्षक कोणत्या एजन्सीद्वारे नेमले आहेत ? त्यांच्या कामाचे करारपत्र (Agreement) व मासिक पगार याची माहिती सादर करावी. ३. ग्रामीण रुग्णालय अजिंठा तालुका सिल्लोड यास मार्च २०२० ते जूल २०२५ पर्यंत किती निधी प्राप्त झाला ? निधी कोणत्या योजनेतून मिळाला, कुठे व कशा प्रकारे खर्च झाला याचा तपशील सादर करावा. ४. ग्रामीण रुग्णालयात सध्या उपलब्ध असलेल्या सर्व औषधांचे यादी सादर करावी,

		कोणते औषध व वैद्यकीय उपकरण अपुरे आहे किंवा संपले आहे त्याची यादी दयावी. ५. रुग्णालयामार्फत पाण्यात टाकून वापरण्यात येणारी औषधे (Bleaching Powder, Chlorine Tablets, Halogen) उपलब्धत आहेत का ? असल्यास त्याची माहिती व वितरण तपशील सादर करावा.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिंलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, १ ते ६ मुद्यांची मागणी केलेली आहे. त्यासाठी आपणास आवश्यक असलेल्या सहा पैकी एका मुद्याची माहिती सादर करण्यात येईल. त्यासाठी आपणास हवी असलेली एका मुद्याची माहिती लेखी स्वरुपात या कार्यालयास कळविण्यात यावी. उर्वरीत मुद्यांच्या माहितीसाठी स्वतंत्र अर्ज या कार्यालयास सादर करण्यात यावा, असे अपिलार्थी यांना दि.०४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि०६.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्येक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---8668---------- दिनांक :-10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९५४/२०२५

बोर्ड अ.क्र.०९

श्री. सुरवसे भास्कर संदिपान, — अपिलार्थी
रा. आहेर चिंचोली,पो. शिरसमार्ग, ता.जि. बीड-४३१ १२२.
मो. नंबर- ९३५९५३४६९६.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. संचालक (अतांत्रिक),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०३.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०९	२२.०८.२०२५	सन २०२१-२०२५ या कालावधीतील. शासन निर्णय, क्रमांक-व्ही ओसी-२००९/(१०९/०९)व्यंशि-४, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ११ मार्च, २०१० अन्वये आपण मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती संभाजीनगर संचलित यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटेक्नीक, बीड येथील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक संदर्भात केलेली तपासणी/ कार्यवाहीचे दस्तऐवज व कागदपत्रे साक्षांकित करुन देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ

पॉलिटेक्नीक, बीड येथील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक तपासणी/ कार्यवाहीचे दस्ताऐवज या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत असे अपिलार्थी यांना दि.०२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या व उपलब्ध असलेल्या माहितीबाबत विहित वेळेत कळविलेले असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती/ माहितीची वस्तुस्थिती अपिलार्थी यांना दि.०२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत केल्याचे दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8669 दिनांक :- 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९७५/२०२५

बोर्ड अ.क्र.-१०

श्री. भूषण दौलतराव मोरे, अपिलार्थी
रा. ३१०, "दौलत" भवन राहूल नगर, परभणी-४३१ ४०१.
मो. नंबर-९४२२८९२०३२, ९४०४०६७३५८.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक,
वन विभाग, वन भवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१०	२९.०९.२०२५	सन २०२२ ते दि.२९.०९.२०२५ वरील कालावधीतचे आपल्या कार्यालयातील कॅशबुक व ३२ नं. व्हाऊचर्स अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे व निवडलेले पानाची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहाय्यक वनसंरक्षक, वन विभाग, वन भवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8670 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६०७८/२०२५ व ६०७९/२०२५

बोर्ड अ.क्र.११ व १२

श्री. दत्ता बाजीराव बनकर, — अपिलार्थी
रा. माळीवाडगांव, ता. गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३१ ११५.
मो. नंबर-९७३०८९३१२३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था,
छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२५ व ३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
११	ऑनलाईन १३.०८.२०२५	कामाचे नाव :- प्र.जी.मा.५६ पाडळसा ते देऱ्हळ-किन्हळ रस्ता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्राम रस्ते विकास संस्था, चेलीपुरा, औरंगाबाद (छ.संभाजीनगर) महाराष्ट्र शासन कार्यालया आणि मे. पटेल कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद (छ.संभाजीनगर) द्वारे संबंधित रोड बनविण्यात आला.०१ रोडचे आराखडे, समतीसुत्र, वर्क ऑर्डर, (वता वतकमत), ०२. ठेकेदाराचे नांव, पत्ता, परवाना क्रमांक, ०३. टेंडर प्रक्रिया, टेंडर नोटीस/ आवश्यकतेची जाहिरात व त्यांचा नंबर/ तारीख, ०४. टेंडर मंजूरीची तारीख व संबंधित मंजूर रक्कम, ०५. करारनाम्याची प्रत, कामाचे कालावधी व काम पुर्णतेची तारीख, ०६. आढावा अहवाल, घटक खर्चाचा तपशील, ०७. मोजणीपत्रक प्रत, कामाचे कालावधी व काम पुर्णतेची तारीख, ०८.ठेकेदांरास केलेल्या पेमेंटसचा तपशील व तारखा, ०९. कामाची गुणवत्ताविषयक

		तपासणी अहवाल व निरीक्षणे, १०. कामाची प्रगती/ मुदतवाढ अर्ज आणि मंजूरीची प्रती, ११. दिनांक १२.०७.२०२५ रोजी, श्री. सचिन खाजेकर अभियंता व अन्य डेप्युटी सहायक अभियंता यांनी सदर रोडच्या बाजूचे पावसाचे पाणी/अन्य पाण्याचा निचरा होण्यासाठी जो पंचनामा केला आहे त्याची साक्षांकित प्रत मिळावी.
१२	ऑनलाईन १८.०८.२०२५	प्र.जी.मा.५६ पाडळसा ते देऱ्हळ-किन्हळ रस्ता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्राम रस्ते विकास संस्था, चेलीपुरा, औरंगाबाद, ०१. दि.३० जून २०२३, अर्ज, ०२. दि.०४.०९.२०२३ अर्ज, ०३. दि.१६.११.२०२३ अर्ज, ००४. दि.०६.०२.२०२४४, अर्ज, ०५. दि.२५ एप्रिल २०२४, अर्ज, ०६.महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मंत्रालय महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, मुंबई-४४०००१ यांचे पत्र क्रमांक ग्रासयो-२०२३/प्र.क्र.१८७/बांधकाम-१, दि.०१ ऑगस्ट २०२५, ०७. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मंत्रालय महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था मुंबई-४००००१, यांचे पत्र क्रमांक ग्रासयो-२०२३/प्र.क्र.१८७/बांधकाम-१, दि.०४ फेब्रुवारी, २०२५, ०८. माननीय प्रशांत वन्सीलाल बंब, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालयाचे पत्र संख्या जा.क्र. / कार्या/ विका/छ.सं./२२५९० दिनांक १९.०६.२०२५, खालील माहिती पुरविण्यात यावी, माझ्या अर्जाची सद्यस्थिती काय आहे ?, अर्जावर कोणत्या अधिकाऱ्याकडे कार्यवाही प्रलंबित आहे ? त्यांचे नावे, पदनाम व हुद्दा द्यावा, अर्जावरील शेरा, टिप्पणी किंवा अभिप्रायाची छायाप्रत द्यावी, माहिती न मिळण्याचे कारण आणि जबाबदार अधिकाऱ्यांचा तपशील, माहिती टपालाने / ईमेलद्वारे प्रधान करावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कुठलीही माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे, नेमकी मागितलेली नाही. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8671 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १३३०/२०२६

बोर्ड अ.क्र.१४

श्री. रामेश्वर रावसाहेब हाडे, — अपिलार्थी
रा. खिंवसरा नगर, बिडकीन, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर- ९३७०२१७२७७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्यादित, पूर्वी छत्रपती संभाजीनगर, ऑरिक इमारत, शेंद्रा-डिएमआयसी औद्योगिक क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्यादित, पूर्वी छत्रपती संभाजीनगर औद्योगिक वसाहत मर्या., ऑरिक इमारत, शेंद्रा-डिएमआयसी औद्योगिक क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१८.०३.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१४	२९.१२.२०२५	बिडकीन डीएमआयसी मधील शेतकऱ्यांच्या संपादीत झालेल्या जमिनीच्या पी.ए.पी.प्लॉट संदर्भात, १. आतापर्यंत प्राप्त झालेले अर्ज, २. त्यावर करण्यात आलेली कार्यवाही, ३. आतापर्यंत वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाची सविस्तर माहिती.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती व माहिती उशिरा देणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीची वस्तुस्थिती दि.०४.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, अवगत केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8672 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०६३६/२०२६

बोर्ड अ.क्र.१५

श्री. लक्ष्मीनारायण छोटेलाल राठोड, — अपिलार्थी
रा. बी-९, ठाकुर निवास, गिरीराज हौसिंग सोसायटी,
कामगार चौक, पंढरपूर वळदगांव, ता.जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९७६३९४२३६१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तहसिल — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिल कार्यालय,
गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.०२.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१५	०३.१२.२०२५	जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र : जा.क्र.२०२५ म.शा.का/२/जमीन-२/गा.ज/कावी दि.१७ जून २०२५ नुसार कार्यवाईची माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली

माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द (अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8521 दिनांक : 7/8/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०२८/२०२६

बोर्ड अ.क्र.१६

श्री. जनार्धन उध्दवराव भुतेकर, — अपिलार्थी
रा. हिवर्डी, ता. जि. जालना.
मो. नंबर-९०७५५९८१११

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हिवर्डी, ता. जि. जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२५.०२.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१६	२३.०९.२०२५	सन २०२१ते २०२५ या कालावधीतील मौजे हिवर्डी ग्रामपंचायत हद्दीमध्ये सन २०२१ ते २०२५ या कार्यकाळात झालेल्या १५ व्या वित्त आयोगात शासनाकडून प्राप्त झालेला निधीची रक्कम व सदरील निधीतून ग्रामपंचायत ने केलेल्या कामावरील खर्च याची काम निहाय तपशिलवार माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी पैसे भरुन घेतले आहेत, तथापि मला अर्धवट माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुनबुजून अर्धवट माहिती दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना अपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील

कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिवर्डी, ता. जि. जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली (यापुर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरीत) माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8673 दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४६/२०२६ व १४७/२०२६

बोर्ड अ.क्र. १७ व १८

श्री. सुनिल शिवाजी शेरे, — अपिलार्थी
रा. लिंबे वडगांव,पो. पाटोदा, ता. मंठा, जि.जालना.
मो. नंबर-९४०५४८६२४९.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
जालना लघु पाटबंधारे विभाग,जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जालना लघु पाटबंधारे विभाग, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२६ (०२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेल आहेत. सदर व्दितीय ष्अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एन.जी.वैष्णव, सहायक प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१७	०६.१०.२०२५	पाटोदा सा. तलाव,मंठा या प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात येणाऱ्या मौजे लिंबेवडगांव, दि.०७.०२.२०२५ रोजीच्या ९२९ मालमत्ताधारकांच्या मूल्यांकनाची यादी व स्वेच्छा पुनर्वसन मागणी केलेल्या मालमत्ताधारकाना प्रत्येकी मिळणारा (भूखंड) मावेजा यांची संपूर्ण यादी स्वेच्छा पुनर्वसन धारकाची माहिती जालना लघु पा. जि. जालना याच कार्यालयातून मिळावी.
१८	०६.१०.२०२५	१. सी. सी. वर्क ऑफ स्पीलवेचा २०२५ या वर्षीचा मंजूर निधी व खर्चाची माहिती, २. पाटोदा साठवण तलाव गळ भरणी करुन जलपुजन केलेल्या तारखेपर्यंत माती भिंत काम व दगडी पिचींग वर झालेल्या खर्चाची माहिती. ३. लिंब वडगांव-पाटोदा व कुंभारी-पाटोदा शेत रस्ता कामावर रु.५.०७ कामाचा तपशिल व खर्च. ४. पुनर्वसन करिता संपादित करण्यात आलेल्या शेतजमीनीवर बांधलेल्या घरांचे मुल्यांकन मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुनबुजून माहिती लपवून ठेवणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता जालना लघु पाटबंधारे विभाग, जालना यांनी अपिलार्थी यांचा माहितीचे दोन्ही अर्ज दि.१५.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, संबंधीत जन माहिती अधिकारी, उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे उपविभाग, मंठा यांना कलम ६(३) नुसार वर्ग केल्याचे दिसून येत आहे. तथापि संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार कार्यकारी अभियंता, जालना लघु पाटबंधारे विभाग, जालना यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जालना लघु पाटबंधारे विभाग, जालना यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8674 दिनांक : 10/8/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे जालना

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४३२ व १४३३/२०२६-०२

बोर्ड अ.क्र.१९ व २०

श्री. विजय पुरुषोत्तम वांगीकर, — अपिलार्थी
रा. उतार गल्ली, काद्राबाद, जालना-४३१२०३.
मो. नंबर- ९४०५८१३३०६.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), समग्र शिक्षा कार्यालय, जिल्हा परिषद, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२५.०३.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उशिराने उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१९	१६.१०.२०२५	मार्च २०२५ ते आजपर्यंत समग्र शिक्षा अंतर्गत ग.सा.के. परतूर येथे कार्यरत वरिष्ठ लेखा लिपीक विजय पु. वांगीकर यांची सेवा परतूर तालुक्यातील दिव्यांग विदयार्थी लाभा पासून वंचित राहील्यामुळे संपुष्टात आणली आहे. त्या संबंधीत संचिकेची (टिपणीसह) साक्षांकित प्रत देण्या तयावी.
२०	१७.११.२०२५	RTI २००५ अंतर्गत मी दाखल केलेल्या तक्रारीवरुन संबंधीतांविरुध्द झालेल्या कार्यवाही संबंधी संचिका, नोटींग आदेश, पत्रव्यवहार व इतर कागदपत्रांची माहितीबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान विलंबाने उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांचे बोर्ड अ.क्र.१९ मध्ये दि.१२.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार सदर माहिती देता येत नाही असे कळविण्यात आलेले आहे. तसेच बोर्ड अ.क्र.२०

मध्ये अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१२.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, आपण दिलेल्या दि.२५.०१.२०२३ च्या तक्रारीनुसार गशिअ यांना चौकशी करण्यास आदेशीत केले होते. संबंधिताच्या चौकशी अहवालानुसार या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस दि.०३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान. विलंबाने उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, बोर्ड अ.क्र.२० मध्ये अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१२.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, आपण दिलेल्या दि.२५.०१.२०२३ च्या तक्रारीनुसार गशिअ यांना चौकशी करण्यास आदेशीत केले होते. संबंधिताच्या चौकशी अहवालानुसार या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस दि.०३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8675 दिनांक : 10/8/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19(3) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

बोर्ड क्रं. २१ ते ५७	द्वितीय अपील क्रं. ४७८५ ते ४७९०/२०२५, ५३०६ ते ५३११/२०२५, २८२७/२०२५ ते ५८३४/२०२५, ४९७७ ते ४९८९/२०२५, २८१/२०२६ ते २८४/२०२६ एकूण ३७ प्रकरणे

	श्री. प्रकाश सुखदेव आहिरे, रा. वार्ड नंबर ०७, जनता हायस्कूल मागे, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर- ४१३ ७०९, मो. नंबर-८६२४८१४९०३.	अपिलार्थी	उपस्थित

विरुध्द

सुनावणी बोर्ड अ.क्र.	द्वितीय अपील क्रमांक	प्राधिकरण	उत्तरदवादी क्र.1 व 2	उपस्थिती
21 व 22	4785 व 4786/2025-02	जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित
23	4787/2025	जन माहिती अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी वर्ग-02, पंचायत समिती, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-01, पंचायत समिती, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित

24 व 25	4788 व 4789/2025	जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी,सजा वैजापूर, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित
26	4790/2025	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिध उपस्थित
27	5306/2025	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम विभाग), पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित
28	5307/2025	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम विभाग), पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित
29	5308/2025	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (पुर्व) कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम, पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

30	5309/2025	जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक), कार्यालय वन भवन रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित तथापि स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित तथापि स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही
31	5310/2025	जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित
32	5311/2025	जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित
33	5827/2025	जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	अनुपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण विभाग, वनवसाहत नवीन प्रशासकीय इमारत 1 मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित
34	5828/2025	जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), परिक्षेत्र वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	अनुपस्थित

		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक), वनविभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित

35 व 36	2829/2025 व 5831/2025	जन माहिती अधिकारी, बाल प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	प्रतिनिधी उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित
37	5830/2025	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता श्रेणी-01, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	प्रतिनिधी, उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

38	5832/2025	जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता श्रेणी-01, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

39	5833/2025	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

40	5834/2025	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

		बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर		

41 व 42	4977/2025 व 4978/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. जिल्हा बिनंधक वर्ग-01, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	अनुपस्थित
43	4979/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	अनुपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

44 व52	4980/2025 व 4988/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

45 व 47	4981/2025 व 4983/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

46 व 48	4982/2025 व 4984/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, गंगापूर, जि.	उत्तरवादी क्र.1	उपस्थित

		छत्रपती संभाजीनगर		
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

49 व 50	4985/2025 व 4986/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

51व 53	4987/2025 व 4989/2025	जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

54,55 व 57	281,282 व 284/2026	जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	उपस्थित

56	283/2026	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.1	उपस्थित
		प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र.2	प्रतिनिधी उपस्थित

(सुनावणी दिनांक 21.07.2026)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,2005 चे कलम 19(3) अन्वये, अपिलार्थी यांनी दि. 27.10.2025 (06), 20.11.2025 (06), 19.12.2025 (08), 04.11.2025 (13) व 19.01.2026 (04) असे एकुण 37 विविध विषयाचे माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. वरीलप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेंत.

अपिलार्थी यांनी 37 माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड अ.क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जाती विषय / तपशिल
21	4785/2025	25.07.2025	सन 2024 ते सन 2025 उपरोक्त कालावधीत आपल्या कार्यालयामार्फत राबविल्या गेलेल्या शेडनेट हाऊस पॉलीहाऊस यांचे अनुदान घेतलेल्या लाभार्थी यांची नावे, त्यांची खरेदीची बिल यांच्या छायाप्रती.
22	4786/2025	25.07.2025	.सन 2024 ते 2025 उपरोक्त कालावधीत आपल्या कार्यालयामार्फत राबविल्या गेलेल्या रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड, लाभार्थी शेतकरी यांची नावे त्यांचा 7/12 उतारा, लागवडी केलेल्या रोपांचे फोटो इ. छायाप्रती.
23	4787/2025	25.07.2025	सन 2024 ते 2025 वरील कालावधीत आपण केलेल्या कामाची दैनंदिनीची कागदपत्राच्या छायांकित प्रती.
24	4788/2025	25.07.2025	दि.01 जानेवारी 2023 ते आजपर्यंत या कालावधीतील मानवी बिनशेती (N.A.) केलेल्या नोंदीसाठी तहसिलदारांनी नोंद मंजूर करणेसाठी दिलेल्या आदेशाची प्रत.
25	4789/2025	25.07.2025	सन 2021 ते आज अखेर उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन मिळावी. 1. कामगार तलाठी कार्यालयात उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांचे नियुक्ती पत्राच्या प्रती, 2. सन 2021 ते आजअखेर पर्यंत उत्पन्न दाखल्यासाठी अर्जदाराने दिलेल्या स्वयं घोषणांच्या छायांकित प्रती.

(बोर्ड अ.क्र.21 ते 57 द्वितीय अपील क्रं. ४७८५ ते ४७९०/२०२५, ५३०६ ते ५३११/२०२५, २८२७/२०२५ ते ५८३४/२०२५, ४९७७ ते ४९८९/२०२५, २८१/२०२६ ते २८४/२०२६ एकूण ३७ प्रकरणे ७/१६)

			3. सन 2021 ते आजअखेर पर्यंतचे आवक-जावक रजिस्टरची छायांकित प्रत.
26	4790/2025	30.07.2025	सन 2021 ते सन 2023 या कालावधीत आपल्या कार्यालयात कर्मचारी व अधिकारी यांची सेवा विषयी तपशिलवार माहिती.
27	5306/2025	17.08.2025	सन 2024 ते सन 2025 या कालावधीत शासनाकडून प्राप्त निधीची माहिती व कसा खर्च केला याची सविस्तर माहिती मिळावी.
28	5307/2025	17.08.2025	सन 2024 मं 2025 आज अखेर वरील कालावधीत केलेल्या कामांच्या वर्क ऑर्डर व एम बी छायाप्रती.
29	5308/2025	17.08.2025	सन.2024 ते 2025 आज आखेर वरील कालावधीत आपल्या सा.बां. उपविभागाअंतर्गत रस्त्याच्या झालेल्या चालू असलेल्या कामाचा देखभाल व दुरुस्ती तसेच अदा केलेल्या बिलाच्या छायांकित प्रती मिळाव्यात.
30	5309/2025	16.08.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद अंतर्गत असलेले सर्व जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयीन फोन नंबर, मोबाईल नंबर यांची तपशिलवार माहिती मिळावी.
31	5310/2025	17.08.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत केलेल्या कामाच्या वर्क ऑर्डरच्या छायाप्रती अदा केलेल्या देयकांच्या छायाप्रति.
32	5311/2025	25.07.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत केलेल्या कामाच्या वर्क ऑडरच्या छायांकित प्रती.
33	5827/2025	04.09.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर या कालावधीत आपल्या कार्यालयाअंतर्गत व कार्यक्षेत्रामध्ये किती रोप/ झाडे लावली, त्यापैकी किती जगली इ. ची तपशीलवार माहिती मिळावी.
34	5828/2025	04.09.2025	सन 2024 ते 2025 आपल्या कार्यालयात कर्मचारी व अधिकारी यांची माहिती, त्यांची सेवा याची तपशिलवार माहिती मिळावी.
35	5829/2025	11.08.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर या कालावधीत प्रत्येक अंगणवाडी विद्यार्थी संख्या, शालेय पोषण आहार, दैनंदिन रजिस्टर व ज्या अंगणवाडया भाडेतत्वावर आहे. त्यासंबंधित करारनामा व ज्या प्रकारे भाडे देतात व्हवचर कॅश अथवा वगेरे या संबंधीत सविस्तर माहितीच्या छायांकित प्रती.
36	5831/2025	11.08.2025	सन 2024 ते सन 2025 आज अखेर या कालावधीत 0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलांचा पोषक अहार व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे मुलांच्या योग्य मानसिक/ सामाजिक विकासासाठी पाया घालने बालमृत्यु मुलांच्या रोगटपणा व कुपोषण शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे या सर्व कामाची तपशिलवार माहिती मिळावी.
37	5830/2025	17.08.2025	सन 2024 ते सन 2025 वरील कालावधीत आपल्या सा.बां. उपविभाग अंतर्गत रस्त्यांच्या झालेल्या व चालू असलेल्या कामाच्या देखभाल व दुरुस्ती तसेच अदा केलेल्या बिलाच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळाव्यात.
38	5832/2025	28.08.2025	सन 2024 ते सन 2025 वरिल कालावधीत केलेल्या कामांच्या एम.बीच्या छायांकित प्रती.
39	5833/2025	25.08.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत झालेल्या

			कामांच्या अदा केलेल्या देयकांच्या छायांकित प्रती.
40	5834/2025	25.08.2025	सन 2024 ते 2025 आज आखेर वरील कालावधीत केलेल्या कामांच्या वर्क ऑर्डरच्या छायाप्रती मिळाव्यात.
41	4977/2025	17.07.2025	2024 ते 2025 आज अखेर वरिल कालावधीत आपल्या कार्यालयात काम करणारे कर्मचारी व अधिकारी यांच्या नियुक्ती पत्राच्या छायांकित प्रती.
42	4978/2025	17.07.2025	सन 2020 ते सन 2022 आज अखेर, सन 2022 या वर्षात माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 4(1)(ख)(एक) अन्वये या कार्यालयातील रचना, कार्य, कर्तव्य याची तपशिलवार माहिती छायांकित प्रतीत.
43	4979/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 आपल्या कार्यालयात कर्मचारी व अधिकारी यांची माहिती, त्यांची सेवा याची तपशिलवार माहिती मिळावी.
44	4980/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 आज आखेर वरील कालावधीत आपल्या कार्यालयात नोंदविलेल्या शेती प्लॉटच्या सर्व खरेदी खताच्या छायांकित प्रती.
45	4981/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत आपल्या कार्यालयात नोंदविलेल्या शेती प्लॉटच्या सर्व खरेदी खताच्या छायांकित प्रती मिळाव्यात.
46	4982/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत आपल्या कार्याल्यात केलेल्या दत्तक पत्राच्या संपूर्ण संचाच्या छायांकित प्रती.
47	4983/2025	17.07.2025	सन 2020 ते सन 2022 आज अखेर, सन 2022 या वर्षात माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 4(1)(ख)(एक) अन्वये या कार्यालयातील रचना, कार्य, कर्तव्य याची तपशिलवार माहिती छायांकित प्रतीत साक्षांकित करुन मिळावी.
48	4984/2025	17.07.2025	सन 2021 ते सन 2023 वरील कालावधीमधील आपण केलेल्या कामकाज दैनंदिनीची छायांकित प्रत साक्षांकित करुन मिळावी.
49	4985/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरील कालावधीत माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 4(1)(ख) मधील 17 बाबीची माहिती मिळावी.
50	4986/2025	17.07.2025	सन 2020 ते सन 2022 आज अखेर, सन 2022 या वर्षात माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 4(1)(ख)(एक) अन्वये कार्यालयातील रचना, कार्य, कर्तव्य याची तपशिलवार माहिती माहिती प्रतीत साक्षांकित करुन मिळावी.
51	4987/2025	17.07.2025	सन 2024 ते 2025 या कालावधीत आपल्या कार्यालयात नोंद दिलेल्या खरेदी खतांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.
52	4988/2025	17.07.2025	सन 2024 ते 2023, सन 2021 ते सन 2023 या वर्षात आलेले उपोषण अर्ज, तक्रार अर्ज, माहिती अर्ज यांच्या छायांकित प्रती.
53	4989/2025	17.07.2025	सन 2023 ते सन 2024, सन 2023 ते सन 2024 या कालावधीत माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम चार (1) (ख) मधील 17 बाबींची माहिती मिळावी.
54	0281/2026	25.07.2025	सन 2022-2023, प्रवासभत्ते, आकस्मिक खर्च, देयकाचा लाभ घेतलेल्यांची नावे, पद इ. कागदपत्रांच्या छायाप्रती.
55	0282/2026	25.07.2025	सन 2022-2023 अनाधिकृत बिनशेती वापराची प्रकरणे शोधून

			त्याचा अहवाल सादर केलेल्या प्रकरणाची माहिती, त्यावर केलेली कारवाई तपशिलवार माहितीच्या छायाप्रती.
56	0283/2026	30.07.2025	सन 2024 ते 2025 आज अखेर वरिल कालावधीत केलेल्या व चालू असलेल्या कामांच्या वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रती.
57	0284/2026	25.07.2025	सन 2022-2023 घरभाडे (भत्ता) घेणारे अधिकारी, कर्मचारी यांच्या नावाची माहिती, घरभाडे घेत असल्याचा कालावधी इ. ची तपशिलवार माहितीच्या छायाप्रती.

2. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, काही प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. माहितीची आवश्यकता असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करावे, व जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती माहिती दिली नाही त्यांच्यावरी शिस्तभंगाची दंडात्मक कार्यवाही करावी, ही विनंती.

3. आज रोजी सुनावणीदरम्यान वरीलप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी हे स्वत: व काही त्यांच्या वतीने प्रतिनिधी यांनी आयोगासमोर अवगत केले की, अपिलार्थी यांनी दोन-तीन वर्षाची विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करुन चिन्हाकित केलेली माहिती नियमानुसार देण्यात येईल असे कळविले असता, अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी वेगवेगळया तारखेत अनेक माहितीचे अर्ज वेगवेळया कार्यालयात करुन जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी केलेली आहे. सदर अर्जावर कार्यवाही करताना कार्यालयाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांची आयोगासमोरील सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले सर्व विचाराधीन अपिले निकाली काढण्याची विनंती करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी हे स्वत: व काही त्यांच्या वतीने प्रतिनिधी यांनी आयोगासमोर अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर वेळोवळी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अशा प्रकारे मोठया प्रमाणावर माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावे लागतात त्यामुळे त्यांचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. तसेच शासनाच्या शासकीय योजनाची अंमजबजावणी करणे शक्य होत नाही.

4. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, याच अपिलार्थी यांचे असाच प्रकारचे नाशिक खंडपीठाकडे, विशेष अपील निर्गत कार्यक्रम, जिल्हा नाशिक/अहिल्यानगर/धुळे सुनावणी दि.02.06.2026 रोजी सुनावणी घेऊन 208 प्रकरणे फेटाळलेले आहेत.

अपिलार्थी यांनी वेगवेगळया कार्यालयामध्ये विविध विषयाबाबत एकुण 37 माहितीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले आहेत. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाना 30 दिवसाच्या मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी यांनी या पध्दतीने एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठया प्रमाणावर माहितीचे अर्ज देऊन माहितीची मागणी करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण केल्या सारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. एका व्यक्तीने मोठया संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहितीची मागणी केली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. मात्र असे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे आयोगाच्या पटलावरील कागदपत्रावरुन दिसुन येत नाही.

5. अपिलार्थी यांनी वेगवेळया सार्वजंनिक प्राधिकरणाकडे मोठया प्रमाणावर माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन प्रशासकीय कामकाम सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 6 (1) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, या अर्जावर 30 दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही, त्यामुळे याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठया प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे प्रथम दर्शनी मत आहे.

6. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्यता कायम राखतांना,या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

7. आयोगाच्या मते अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी / सार्वजनिक प्राधिकरणांकडे अशा प्रकारचे माहिती अर्ज विस्तृत, दिर्घकालावधीची, निरर्थक माहितीची मागणी केल्यास माहिती अधिकार अधिनियम, 2005 या कायद्याचा बेदकारपणे दुरुपयोग होऊन निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे. माहिती अधिकार अधिनियमा नुसार माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला, तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार एकाच विषयावर माहिती अर्ज करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा अपिलार्थी यांचा हेतू असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

8. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील 6454/2011, दिनांक 09.08.2011 रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

9. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी अत्यंत विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.20182, दिनांक 27.01.2009 मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

10. अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या सर्व व्दितीय अपील प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, नमूद करण्यात येते की, याबाबत केंद्रीय माहिती आयोगाने एस.के.लाल विरुध्द रेल्वे मंत्रालय (अपील क्र.सीआयसी/ ओके/ए/2006/00268-272, दिनांक 29.12.2006) प्रकरणात संबंधित अपिलार्थीने रेल्वे प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या पाच माहिती अर्जाव्दारे रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्ग यांची संपूर्ण / सर्व अभिलेखे याबाबत माहिती मागितल्या प्रकरणी निकाल पारित करताना खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविलेले आहे.

केंद्रीय माहिती आयोगास प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास आले की, माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा जरी नागरीकांना, कलम 8 वगळण्यात आलेल्या 10 बाबींशिवाय इतर, अशी कोणतीही माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार प्रदान करीत असला तरी, याचा अर्थ असा नव्हे की, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या क्षुल्लक व अर्थहीन माहिती अर्जाची दखल घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहिती आयोगाची धारणा आहे की, रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्गाची संबंधित यांची संपूर्ण / सर्व अभिलेख यांच्या माहितीची मागणी करणे हे केवळ माहिती अधिनियमाचा थट्टा उडविणे आहे.

11. याबाबत केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/2012/000858-SA ते 000872-SA संदर्भात दिनांक 04.07.2014 रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.246/IC(A)2006, F No.CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 Auguest 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

IN Shri Gopal Soni V The New India Assurance Company Ltd.

(F.No.CIC/AT/A/2008/00097, 000116, 000124, dated 12.06.2008) learned Commissioner Shri A.N. Tiwari dealt with similar problem. The respondents in the case submitted that the appellant, their employee, was suspended for insubordination and misconduct, and ever since be directed a spate of application containing queries for detailed, voluminous but inane information which would have to be collected and collated from over 30 branches. The Commission held in this case "answering the elaborate and detailed queries, which have to be both accurate and authentic, imposes heavy cost on the public authority and tends to divert its recourses, which brings it within the scope of section 7 (9) of RTI Act"

12. तसेच मा.शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/ 000926/SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17 th January, 2012) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."

13. तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

14. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत मोठया प्रमाणवर माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणें शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोगाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित

साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांची दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करताना, शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिलार्थी यांची एकूण सर्व 37 द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 8676 / दिनांक : 10/8/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८१३ व ८१४/२०२५-०२

बोर्ड अ.क्र.५८ व ५९

श्री. शरद भारत धनतोळे, — अपिलार्थी
मु. पो. नवगांव, ता. पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३१ १३७.
मो. नंबर- ८४८२८६३७३५ / ९५९५५२७६६९.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, नवगांव,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २१.०७.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
५८	१६.१०.२०२४	सन २०२१ ते माहिती अर्ज निकाली दिनांकापर्यंत १. शाळा व्यवस्थापन सभा रजिस्टरची झेरॉक्स प्रत, २. वार्षिक तपासणी रजिस्टरची झेरॉक्स प्रती व लेट मार्क रजिस्टरची झेरॉक्स प्रत, ३. गणवेश वाटप व पाठयपुस्तक वाटप रजिस्टरची झेरॉक्स प्रत, ४. शा. पो. आहार कॅशबुकची झेरॉक्स प्रत.
५९	१६.१०.२०२४	सन २०१९ ते माहिती अर्ज निकाली दिनांकापर्यंत, १. समग्र शिक्षण अभियान अंतर्गत आलेल्या निधिची माहिती, २. निधी कशा प्रकारे वापरण्यात आला त्याचा तपशिल देण्यात यावा, ३. २०२४ ते पुढील स्थापन करण्यात आलेल्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रीयाची प्रोसीडींग बुकची झेरॉक्स प्रती देण्यात यावी. (७५ % व २५ %) प्रमाणे आणि सदस्यांची नावासहित यादी दयावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे ज़न माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिल्याचे दिसून येत नाही. यास्तव अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, नवगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (एक वर्ष कालाधीची सन २०२४-२०२५) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8659 दिनांक : 10/8/2026

	राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19(3) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

बोर्ड क्रमांक : 97	**द्वितीय अपील क्रमांक :- 1795/2025**

अक्र.	तपशिल	
1	श्री. रामदास शिवाजी मगरे, रा. न्यु हनुमान नगर गल्ली नंबर 02, घर क्र. 04, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर	अपिलार्थी
	विरुध्द	
1	जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक संलग्न विभागीय सह निबंधक सहकारी संस्था अंजुमन बंगला अदालत रोड, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र. 1
2	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय उप निबंधक सहकारी संस्था, भुविकास बॅक इमारत क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर	उत्तरवादी क्र. 2

(सुधारीत आदेश दिनांक 21.07.2026)

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक 1795/2025 निर्णय दिनांक 21.01.2026 या आदेशामध्ये पुढील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी दिनांक 06.05.2025 रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,2005 चे कलम 19(3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक 21.01.2026 रोजी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच सुनावणीसाठीचा बोर्ड (वादसूची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर प्रकरणात सुनावणी घेण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे जोडपत्र "अ" नुसार माहिती अर्जाद्वारे खालील नमुद केल्याप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील थोडक्यात विषय..
09.12.2024	"औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेतील बिंदुनामावलीची प्रमाणित प्रत मिळणे बाबत.."

सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी ज्या संस्थेची माहितीची मागणी केलेली आहे, त्या संस्थेस माहिती अधिकार कायदा लागू नसल्यामुळे माहिती देणे बंधनकारक नाही, असे अपिलार्थीस दिनांक 01.01.2025 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन व युक्तीवादावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक 09.12.2024 रोजीच्या माहिती अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, संलग्न विभागीय सह निबंधक सहकारी संस्था यांचेकडे "**औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बिंदुनामावलीची प्रमाणीत प्रत मिळणेबाबत मागणी केलेली आहे.**" यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, संलग्न विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 01.01.2025 रोजीच्या पत्राद्वारे माहिती अधिकार अधिनियम,2005 मधील तरतुदी सहकारी संस्थेस लागु नसल्यामुळे आपण मागविलेली माहिती बॅकेस देणे बंधनकारक नाही, असे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक 05.02.2025 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेवून अपिलार्थीस 07 दिवसात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना दिनांक 09.04.2025 अन्वये आदेशीत केलेले आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

आदेश

1. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, संलग्न विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जात नमुद केलेल्या

विषयासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 09.04.2025 रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार आयोगाचे आदेश प्राप्त होताच 30 दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कलम 7(6) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

2. विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

3. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. द्वितीय अपील क्र. 1795/2025 /7836 दि. 23/7/2026